**कोहळ ल.पा.यो. ता. नेर जि. यवतमाळ योजनेस चतुर्थ सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.**

# विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर

**महामंडळ निर्णय क्रमांक : १२५ /विपाविम/कातां ३(१)/(धा.क्र.७४/२०१८)/ कोहळ ल.पा.यो /चतुर्थ सुप्रमा/ २०२३, दि.१४/०७/२०२३**

**संदर्भ :-**
१. महामंडळाचा तृतीय सुप्रमा आदेश क्र. विपाविम/ कातां-७/२०३/कोहळ/सुप्रमा (१६८/ २००९)), दि.२६/०७/२०१६
२. शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१५/(३५/२०१५)/जसं(आ), दि. ०९.०९.२०१५.
३. राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नासिक यांचे पत्र क्र.रातासंस (१)/कक्ष-१ (मु)/ कोहळ (धा.क्र.३/२०१९)/ १२९ /२०१९, दि.३१/०१/२०१९
४. अतिरीक्त मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, यांचे अध्यक्षतेखाली दि.१३/०५/२०२२ रोजी झालेल्या सचिव स्तरावरील उपसमितीच्या बैठकीचे इतिवृत्त क्र. बैठक-२०२२/ (१२२/२०२२)/लपा, दि. १७/०६/२०२२.
५. विपाविम नियामक मंडळाचे दि. १९/०६/२०२३ चे ८३ व्या बैठकीतील ठराव क्र. ८३/१३

**प्रस्तावना :**

कोहळ ल. पा. योजना, या महामंडळांतर्गत गोदावरी खोऱ्यातील पेनगंगा उपखोऱ्यात नेर तालुक्यातील स्थानिक नाल्यावर बांधण्यात येत आहे. सदर योजनेमुळे यवतमाळ जिल्ह्यातील ९३ हेक्टर व अमरावती जिल्ह्यातील ११२७ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे.

कोहळ ल.पा. योजनेस शासन निर्णय क्र.लपात/२२९१/(५६३/९१) /लपा-२, दि.०८.०२.१९९६ नुसार सन १९९४-९५ चे दरसुचीवर आधारीत रू.९.०६ कोटी (रू. नउ कोटी सहा लक्ष) इतक्या रकमेस मुळ प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती. त्यानंतर या योजनेस शासन निर्णय क्र लपायो/२३०३/(३९०/०३)/ लपा-२, दि.०३.०३.२००४ नुसार सन २०००-०१ च्या दरसुचीवर आधारित रु. २८.२४ कोटी (रू. अठ्ठाविस कोटी चोविस लक्ष फक्त ) इतक्या रकमेस नव्याने प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती. त्यानंतर या योजनेस महामंडळाचे व्दितीय सुप्रमा आदेश क्र. विपाविम/कातां-७/६६२/कोहळ/ सुप्रमा (१८६/ २००९)), दि.१८/०८/२००९ नुसार सन २००८-०९ च्या दरसुचीवर आधारित रु. ४४.२१ कोटी (रू. चवरेचाळिस कोटी एकविस लक्ष फक्त ) इतक्या रकमेस द्वितीय प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात आली होती. तद्नंतर प्रकल्पाच्या किंमतीत विविध बाबींमध्ये पुन्हा वाढ झाल्यामुळे प्रकल्पास महामंडळाचे तृतीय सुप्रमा आदेश क्र. विपाविम/ कातां-७/२०३/कोहळ/सुप्रमा (१६८/ २००९)), दि.२६/०७/२०१६ नुसार सन २०१४-१५ च्या दरसुचीवर आधारित रु. ७४.९८ कोटी (रू. चवऱ्याहत्तर कोटी अठ्ठांनव लक्ष फक्त ) इतक्या रकमेस तृतीय प्रशासकिय मान्यता प्राप्त झाली आहे.

बांधकामाचे दरम्यान योजनेच्या खर्चात दरसुचीतील बदल यामुळे वाढ, भुसंपादन खर्चातील वाढ, अपुऱ्या तरतुदीमुळे वाढ, इतर कारणामुळे व अनुषंगीक खर्च इत्यादी कारणामुळे वाढ झाली

असून योजनेची अद्यावत किंमत तृतीय प्रशासकीय मान्यता किंमतीच्या दहा टक्क्याहून अधिक वाढत असल्यामुळे चतुर्थ सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करणे आवश्यक झाले आहे.

कोहळ ल.पा. योजना चतुर्थ सुप्रमा बाबतचा छाननी अहवाल राज्यस्तरीय तांत्रीक सल्लागार समिती (१), नाशिक, यांचे दि. १७/०१/२०१९ रोजीच्या १२५ व्या बैठकीत अंतिम करण्यात आला असून पुढील कार्यवाहीस्तव संदर्भिय पत्र क्र. ३ नुसार प्राप्त झालेला आहे.

कोहळ ल. पा. योजनेच्या चतुर्थ सुप्रमा प्रस्तावावर अतिरीक्त मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, यांचे अध्यक्षतेखाली दि.१३/०५/२०२२ रोजी झालेल्या मा. सचिव स्तरावरील उपसमितीचे बैठकीत चर्चा होवून प्रस्ताव नियामक मंडळासमोर पुढील निर्णयार्थ सादर करण्यास सहमती दर्शविण्यात आली आहे.

संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयानुसार विदर्भातील प्रकल्पांना सु.प्र.मा. देण्याचे अधिकार महामंडळास प्रदान करण्यात आलेले आहेत.

दि. १९/०६/२०२३ रोजी झालेल्या नियामक मंडळाचे ८३ व्या बैठकीतील ठराव क्र. ८३/१३ नुसार कोहळ ल. पा. योजनेच्या रू. ११५.९० कोटी किंमतीच्या चतुर्थ सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्तावास, राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीच्या तपासनी अहवालातील मुद्दा क्र. २६ व २७ ची पुर्तता करण्याच्या अटीचे अधीन राहुन, तसेच मा.सचिव स्तरावरील उपसमितीच्या दि. १३/०५/२०२२ च्या बैठकीमध्ये उपसमितीने उपस्थित केलेल्या मुद्यांचे अटींचे पुर्ततेचे अधीन राहून व शिफारशीनुसार मान्यता दिली असून या बाबतचे आदेश कार्यकारी संचालक यांनी निर्गमित करणेकरिता नियामक मंडळाने मान्यता प्रदान केलेली आहे.

सदर प्रकल्पाच्या तृतिय सुधारीत प्रशासकीय मान्यता किंमत रू. ७४.९८ कोटी च्या तुलनेत चतुर्थ सुधारित प्रकल्प अहवालाची किंमत रू. ४०.९३ कोटी ने जास्त आहे. किंमत वाढीची प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे आहेतः-

| **अ. क्र.** | **बाब** | **वाढ रू कोटी** | **मंजुर तृतीय सुप्रमा किंमतीच्या तुलनेत वाढीची टक्केवारी** | **एकूण वाढीच्या तुलनेत वाढीची टक्केवारी** |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | दरसुचीतील बदलामुळे झालेली वाढ | ०.७७ | १.०४ | १.८८ |
| २ | भूसंपादनाच्या किंमतीतील वाढ | ४०.१९ | ५३.६१ | ९८.१९ |
| ३ | अपु-या तरतुदीमुळे झालेली वाढ | ०.९५ | १.२६ | २.३२ |
| ४ | इतर कारणामुळे झालेली वाढ | -०.८१ | -१.०८ | -१.९८ |
| ५ | अनुषंगीक खर्च वाढ | -०.१७ | -०.२२ | -०.४१ |
| | **एकूण** | **४०.९३** | **५४.६१** | **१००** |